/

**Deputy Superintendent of Police, ACB, Nandurbar**
पोलीस उपअधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार
१२, जयचंद नगर, कोरीट रोड, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार–४२५४१२
☎ (०२५६४) २३०००९
✉dyspacbnandurbar@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**ला.प्र.वि.कार्यालय,नंदुरबार**
**कॅम्प तळोदा पोलीस स्टेशन**
**दिनांक ०३/०७/२०२३.**

**-: प्रेस नोट :-**

**आलोसे नंदलाल प्रभाकर ठाकुर, वय-४४, व्यवसाय-नोकरी तलाठी (वर्ग-३), सजा-अंमलपाडा तहसिल कार्यालय तळोदा ता. तळोदा जि.नंदुरबार मुळ रा.देवमोगरा कॉलनी प्लॉट नं १९ ब,वाडीभोकर रोड,धुळे ता.जि.धुळे यांना ५,०००/- रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना पंचसाक्षीदारांसमक्ष रंगेहात पकडले बाबत...**

| | |
|---|---|
| **घटक** | नंदुरबार |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | कार्यवाही सुरु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | आलोसे नंदलाल प्रभाकर ठाकुर, वय-४४, व्यवसाय-नोकरी तलाठी (वर्ग-३), सजा-अंमलपाडा तहसिल कार्यालय तळोदा ता. तळोदा जि.नंदुरबार मुळ रा. देवमोगरा कॉलनी प्लॉट नं १९ ब,वाडीभोकर रोड,धुळे ता.जि.धुळे |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | ५०००/- रुपये (पाच हजार रुपये) |
| **तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम** | ३०००/- रुपये (तीन हजार रुपये) |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांचे मुळ गाव पाठडी ता.तळोदा येथे वडीलोपार्जित शेतजमिन असल्याने त्यांचे सातबारा उताऱ्यावर तक्रारदार, त्यांची आई व भाऊ यांची नावे असून तक्रारदार यांची आई व भाऊ मयत झाल्याने सदर शेतजमिनीचे सातबारा उताऱ्यावरुन मयत आई व भाऊचे नावे कमी करुन नवीन सातबारा उतारा काढून मिळण्याचे प्रकरण तक्रारदार यांनी सन २०२१ पासून आलोसे तलाठी श्री. ठाकूर यांचेकडे दिलेले होते. तेव्हा आलोसे श्री. ठाकूर यांनी तक्रारदार यांचेकडून नवीन सातबारा उतारा देण्याचे मोबदल्यात २५,०००/- रुपये द्यावे लागतील असे सांगितले होते.<br>सदर नवीन सातबारा लवकरात लवकर मिळावा यासाठी तक्रारदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला असता आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडून बक्षीस स्वरुपात वेळोवेळी १५,०००/- रुपये घेतलेले होते. एवढे पैसे देऊनही तक्रारदार यांचे काम न झाल्याने त्यांनी मे- २०२३ मध्ये संबधीत सर्कल यांचेकडे तक्रार केली असता सर्कल ऑफिसर यांनी त्यानां तात्काळ नवीन सातबारा उताऱ्याचे कागदपत्र तयार करुन दिली व संबधित कागदपत्रांवर आलोसे तलाठी श्री. ठाकूर यांची सही व शिक्का घेणेबाबत सांगितले होते. |

| | |
|---|---|
| | त्यानंतर दिनांक १९/०६/२०२३ रोजी सातबारा उताऱ्यावर सही शिक्का देण्याचे मोबदल्यात आलोसे यांनी २५,०००/- रु पैकी उर्वरीत १०,०००/- रुपयाची मागणी करुन कमीत कमी ५,०००/- रुपये दिल्याशिवाय सातबारा उताऱ्यावर सही-शिक्का देणार नाही असे सांगितले.करीता दिनांक २६/०६/२०२३ रोजी तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथे लाच मागणीसंबधाने तक्रार दिल्याने पंचांसमक्ष पडताळणीदरम्यान आलोसे तलाठी श्री. ठाकूर यांनी तक्रारदार यांचेकडे सातबारा उताऱ्यावर सही शिक्का देण्याचे मोबदल्यात ५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३,०००/- रुपये लाच मागीतल्याचे पडताळणीदरम्यान निष्पन्न झाल्याने आज रोजी दिनांक ०३/०७/२०२३ रोजी तलाठी भवन तळोदा कार्यालयाचे कंपाऊड मध्ये असलेल्या झाडाखाली तक्रारदार यांचेकडून आलोसे तलाठी श्री. नंदलाल ठाकूर यांना ३,०००/- रुपये लाच स्विकारलेनंतर पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आलेले असून त्यांचेवर तळोदा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| **कामगिरी पथक** | मा. श्री. राकेश चौधरी, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, नंदुरबार युनिट यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक माधवी एस.वाघ, पोलीस निरीक्षक समाधान वाघ, पोहवा/विलास पाटील, पोहवा/विजय ठाकरे, पोना/मनोज अहिरे, पोना/अमोल मराठे, पोना/देवराम गावीत, मपोना/ज्योती पाटील व चापोना/जितेंद्र महाले , ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार पथकाने केली आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नंदुरबार जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबाबत तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कार्यालयास संपर्क करावा.


**संपर्क पत्ता** : ला.प्र.वि.नंदुरबार कार्यालय, नंदुरबार
**संकेतस्थळ** : acbnandurbar@gmail.com
**ई–मेल** : dyspacbnandurbar@mahapolice.gov.in
**ऑनलाईन तक्रार** : acbnandurbar@gmail.com
**टोल फ्री क्रमांक** १०६४
विभाग,नंदुरबार
**दुरध्वनी क्रमांक** : ०२५६४–२३०००९


**(माधवी एस.वाघ)**
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक